**आकाशवाणी नागपूर,**

**शुक्रवार दिनांक ०९ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी राजकीय पक्षांकडून आधुनिक तंत्रज्ञान आणि डिजिटल साधनांचा वापर.**
2. **नागपूर जिल्ह्यातील सावनेर, खापा आणि पाटणसावंगी परिसरात वाळू व्यवसायाशी संबंधित प्रकरणात ईडीची कारवाई.**
3. **नागपूर विद्यापीठातून जगाच्या पटलावर आपलं वर्चस्व सिद्ध करणारी विद्यार्थ्यांची फळी निघाली असल्याचं एम्स् नागपूरचे अध्यक्ष डॉ.अनंत पंढरे यांचं दीक्षांत सोहळ्यात प्रतिपादन.**
4. **मराठी चित्रपट दशावतारसह एकूण ४ चित्रपट ऑस्करच्या सर्वसाधारण श्रेणीसाठी पात्र, कांतारासह ५ चित्रपट उत्कृष्ट चित्रपटांच्या यादीत.**

प्रचाराला वेग/सभा

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठीचा प्रचाराने वेग घेतला आहे. उमेदवार आणि विविध राजकीय पक्ष मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि डिजिटल साधनांचा वापर करत आहेत. पारंपरिक जाहीर सभा, प्रचारफेरी आणि पदयात्रांसोबतच आता निवडणूक प्रचारात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्सचा समावेश केला जात आहे.मतदारांची ओळख पटवणं, त्यांच्या गरजा समजून घेणं तसच राजकीय पक्षांनी राबवलेल्या विकास कामांची माहिती प्रभावीपणे मांडण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकीत आपल्या पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी नागपुरातील वाठोडा, शांतीनगर आणि कळमना इथं आज संध्याकाळी सभा घेणार आहे.

मतदान पद्धती

महानगरपालिकेच्या निवडणुकीत चार सदस्यीय प्रभाग पद्धती लागू असल्यान प्रत्येक मतदारान चार मते देण बंधनकारक आहे का? किंवा चारपेक्षा कमी मते दिल्यास मतदान बाद होईल का, असे प्रश्न मतदारांमध्ये निर्माण झाले आहेत. या संदर्भात, प्रशासनान स्पष्ट केल आहे की चारपेक्षा कमी म्हणजे एक, दोन किंवा

तीन मते दिली तरीही दिलेली सर्व मते वैध ठरतील. तरीदेखील, नागरिकांनी सर्व चार मते देऊन आपल कर्तव्य पार पाडाव, अस आवाहन करण्यात आल आहे.

मतदार ओळखपत्र

महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये मतदानासाठी मतदार ओळखपत्रासह १२ पुरावे ग्राह्य धरले जाणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या वतीन ही माहिती देण्यात आली. यामध्ये पासपोर्ट, आधार ओळखपत्र, वाहन चालवण्याचा परवाना, आयकर विभागाकडील पॅन ओळखपत्र, राष्ट्रीयकृत बँका अथवा टपाल खात्याची खातेदाराची छायाचित्रासह असलेली खातेपुस्तिका, सक्षम प्राधिकाऱ्यान दिलेला फोटोसहीत अपंगत्वाचा दाखला,राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखालील फोटो असलेले ओळखपत्र,आदी कागदपत्रांचा या ओळखपत्रांमध्ये समावेश आहे.

अजित पवार

सध्या देशात, आणि राज्यात ज्या काही राजकीय घडामोडी घडत आहे, त्या पार्श्वभूमीवर विविध पक्षाच्या नेत्यांना प्रलोभन देत, त्यांच्यावर दबाव टाकून पक्षांतर करण्यास भाग पाडलं जात आहे. त्यामुळे आजच्या काळात पक्षांतर ही सामान्य गोष्ट झाली असल्याचं मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केलं. पक्षाचे समर्थक वाढवण्यासाठी राजकीय पक्ष विविध मार्ग अवलंबत असल्याबद्दल पवार यांनी चिंता व्यक्त केली.

ईडी छापे

नागपूर जिल्ह्यातील सावनेर, खापा आणि पाटणसावंगी परिसरात वाळू व्यवसायाशी संबंधित प्रकरणात ईडी अर्थात अंमलबजावणी संचालनालयान आज पहाटे एकाच वेळी छापे टाकले. 2021 मध्ये वाळू रॉयल्टी चुकवून कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय केल्याच्या गुन्ह्याच्या अनुषंगान ही कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष उत्तम कापसे यांच्याशी संबंधित ठिकाणांचाही समावेश असल्याची माहिती हिंदुस्थान समाचार वृत्त संस्थेन दिली आहे.

मंगलप्रभात लोढा

‘विज्ञान म्हणजे केवळ एआय तज्ज्ञ किंवा आयटी इंजिनिअर घडविण्याचे माध्यम नसून, ज्ञानातून नवे शोध निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. भारतान प्राचीन

काळापासून विज्ञानाची कास धरली असून आपला विज्ञानाचा पाया मजबूत राहिला आहे', असं प्रतिपादन कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केलं. विज्ञान भारती विदर्भ प्रदेश मंडळ आणि धरमपेठ एम. पी. देव स्मृती विज्ञान महाविद्यालय यांच्या सहयोगानं आयोजित विदर्भ विज्ञान महोत्सव आणि विज्ञान प्रदर्शनाचं उद्घाटन आज मंत्री लोढा यांच्या हस्ते करण्यात आलं. विज्ञान चळवळीचे अग्रणी शिक्षक जयंतराव सहस्त्रबुद्धे यांच्या स्मृति प्रीत्यर्थ २८ फेब्रुवारी हा विज्ञान दिन यापुढे 'जयंतराव सहस्रबुद्धे विज्ञान दिन' म्हणून साजरा करण्याबाबत शासन निर्णय त्वरित काढण्यात येईल असंही लोढा यांनी यावेळी जाहीर केलं.

शाळा बंद

शिक्षकांच्या अभावामुळे पालकांचा संताप अनावर होत भंडारा जिल्ह्यातील बोथली येथील जिल्हा परिषद शाळेला कुलूप ठोकण्यात आलं . शाळेत सात वर्गांसाठी केवळ एकच शिक्षक कार्यरत आहे. वीस दिवसांपूर्वी इतर शिक्षकांची बदली झाल्यानंतर अद्याप नवीन नियुक्ती न झाल्यानं विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर झाला आहे. या संदर्भात शाळा व्यवस्थापन समितीनं गट विस्तार अधिकारी, मोहाडी यांना लेखी निवेदन देत दोन दिवसांत शिक्षक उपलब्ध न केल्यास आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र कोणतीही ठोस कारवाई न झाल्यानं पालकांनी शाळेला कुलूप ठोकत निषेध केला. परिस्थिती तणावपूर्ण झाल्यानं वरठी पोलिसांना पाचारण करण्यात आलं. दरम्यान, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुधीर ढबाले यांनी विद्यार्थ्यांच्या जेवणाची व्यवस्था केली असून, स्थायी शिक्षक मिळेपर्यंत ग्रामपंचायतीसमोर पेंडाल उभारून पर्यायी शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

दीक्षांत सोहळा

कुठलीही शैक्षणिक संस्था ही त्या संस्थेतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे ओळखली जाते. नागपूर विद्यापीठातून जगाच्या पटलावर आपलं वर्चस्व सिद्ध करणारी विद्यार्थ्यांची फळी निघाली असल्याचं सांगून विद्यार्थ्यांसाठी काहीच अशक्य नसल्याचं अखिल भारतीय आयुर्वेद ज्ञान संस्था, नागपूरचे अध्यक्ष डॉक्टर अनंत पंढरे यांनी सांगितलं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ११३ वा दीक्षांत समारंभ आज ऑडिटोरियम हॉल, नॅशनल फायर सर्विस कॉलेज राजनगर, इथं संपन्न झाला, त्यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते

या समारंभात एकूण ६१ हजार ८७१ विद्यार्थ्यांना पदवी आणि पदविका प्रदान करण्यात आल्या. तर २७९ संशोधकांना आचार्य पदवीने सन्मानित करण्यात आलं. समारंभात १४० गुणवंत विद्यार्थ्यांना २२९ सुवर्ण, रजत आणि रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली .यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेजच्या क्रांतिका धोटे हिला पाच सुवर्ण आणि दोन पारितोषिकांसह सर्वाधिक सात पुरस्कार मिळाले, तर धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रभाग संस्थान नागपूरचा एमबीएचा विद्यार्थी सुचेतन गभने याला सर्वाधिक सहा सुवर्णपदक मिळाली.

ऑस्कर

'कांतारा-द लिजंट चॅप्टर १, तन्वी द ग्रेट, महावतार नरसिम्हा, टुरिस्ट फॅमिली, आणि सिस्टर मिडनाइट' हे ५ भारतीय चित्रपट ऑस्करच्या उत्कृष्ट चित्रपट श्रेणीसाठी पात्र ठरले आहेत. अकादमी ऑफ मोशन पिक्चरने आज ही घोषणा केली. याशिवाय 'दशावतार, महामंत्रा, पेपर फ्लॉवर, पारो' हे ४ चित्रपट सर्वसाधारण श्रेणीसाठी पात्र आहेत. एकूण ३१७ चित्रपट ९८ व्या ऑस्कर पुरस्कारांसाठी पात्र ठरले आहेत. त्यातल्या २०१ चित्रपटांकडे उत्कृष्ट चित्रपट श्रेणीसाठीची अतिरीक्त पात्रता असल्याचं अकादमीनं जाहीर केलं. या सर्व चित्रपटांमधून ऑस्करसाठी नामांकित झालेल्या चित्रपटांची यादी २२ जानेवारी रोजी जाहीर होईल. याशिवाय भारताकडून आंतरराष्ट्रीय चित्रपट श्रेणीसाठी होमबाऊंड या चित्रपटाचं नामांकन करण्यात आलं आहे.

चिया तिळगूळ महोत्सव

वाशिम कृषी विभागाच्या प्रयत्नान जिल्ह्यातील महिला आणि शेतकरी बचत गटांनी शेतीशिल्प या ब्रॅंड खाली चिया तिळगूळ, चिया चिक्की आणि चिया न्यूट्री बारचे उत्पादन केले आहे . या उत्पादनाची विक्री करून बचत गटांच उत्पन्न वाढवण्यासाठी कृषी विभागान "चिया तिळगूळ महोत्सवाचं आयोजन केलं आहे. या महोत्सवाला जास्तीत जास्त नागरिकांनी प्रतिसाद द्यावा अस आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी आरिफ शहा यांनी केलं आहे.........

रब्बी हंगाम

बुलढाणा जिल्ह्यात रब्बी हंगाम 2025 साठी ई-पीक पाहणी सुरू असून शेतकऱ्यांनी 24 जानेवारी पूर्वी अँड्रॉईड मोबाईलद्वारे सातबारावर पीक नोंदणी करावी, असं आवाहन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केल आहे.

हवामान

विदर्भातील सर्व जिल्ह्यात किमान तापमानात आज किंचित वाढ नोंदविण्यात आली. विदर्भात आज गोंदिया जिल्ह्यात सर्वात कमी ९ पूर्णांक २ अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. त्यानंतर भंडारा इथं १० अंश सेल्सिअस, नागपुर १० पूर्णांक २ तर यवतमाळ इथं १० पूर्णांक ४ अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं.

******